# प्रकरण ४ थे

## 'प्रेषित' आणि 'अभयारण्य'

## या विज्ञान कादंबऱ्यांचे

## अभिव्यक्ती व वाङ्‌मयीन विशेष

# प्रकरण ४ थे

# 'प्रेषित' आणि 'अभयारण्य' या विज्ञान कादंबऱ्यांचे अभिव्यक्ती व वाङ्:मयीन विशेष

## ४.१ प्रास्ताविक

मराठी ललित साहित्याच्या परंपरेत विज्ञान साहित्य या संकल्पनेखाली येणारे लेखन अलिकडच्या काळात प्रारंभ झाले असून मान्यवर शास्त्रज्ञांनी या लेखनाला सुरूवात केली. त्यामुळे ते रसिकांच्या कुतुहलाचा विषय बनले आहे. विज्ञानाने सिध्द केलेले सिध्दांत चमत्कृतीचा किंवा कुतुहलाचा भाग म्हणून राहिलेले नाहीत. तर कलावंताच्या जाणिवाही विज्ञानाने व्यापून टाकल्या आहेत मराठीतील एक स्वतंत्र वाङ्:मयीन प्रवाह म्हणून त्याचे अस्तित्व मान्य झालेले आहे. त्यापैकी विज्ञान साहित्याने कथा, कादंबरी व नाटक या वाङ्:मय प्रकारात महत्त्वाचे स्थान मिळालेले आहे. याचे कारण म्हणजे कुतुहल निर्मिती आणि वाचकास आकलन करून देऊन त्यातून भय, अनुकंपा, चमत्कृतीपूर्णता, तार्किकता, इ. भावना वाचकांच्या मनात निर्माण करण्यात हा वाङ्:मयप्रकार यशस्वी झालेला आहे.

कलावंताला आलेला अनुभव तो जसाच्यातसा नाही तर वेगवेगळया पध्दतीने त्याला साहित्यिक रूप देऊन विज्ञान कादंबरीची सामान्य वाचकाला ओळख करून दिलेली आहे. 'प्रेषित' या कलाकृतीचे वेगळेपण, त्यातील वाङ्:मयीन मूल्ये कादंबरी या वाङ्:मयप्रकारास आवश्यक असणाऱ्या वाङ्:मयीन कसोटया या अनुषंगाने प्रेषितचे मूल्यमापन प्रस्तुत प्रकरणात केले आहे.

## ४.२ 'प्रेषित' आणि 'अभयारण्य' या विज्ञान कादंबऱ्यांचे भाषाविशेष

### १. 'प्रेषित' या विज्ञान कादंबरीचे भाषाविशेष

'प्रेषित' या कादंबरीचा एकूण डोलारा हा शहरी आणि उच्चभ्रू भाषिक शैलीवर उभा आहे. प्रत्येक कलाकृतीत भाषेला महत्त्वाचे स्थान असते. त्याप्रमाणेच कादंबरीमध्ये सुध्दा भाषेला अनन्यसाधारण महत्त्व असते. लेखक कलाकृतीसाठी जी भाषा वापरतो

तीच लेखकाची भाषा असते. स्वत:च्या लेखनासाठी वापरलेली भाषा त्याच समाजजीवनातील असेल तर त्या कलाकृतीला एक प्रकारचा जीवंतपणा येतो. अन्यथा कलाकृतीचा तोल ढासळतो. उदा. विज्ञान कलाकृतीत विज्ञानाची रचना दाखवायची असेल तर तिच्यातील पात्रे व संवाद हे त्याच पध्दतीचे असणे आवश्यक आहे. म्हणजे पात्राच्या भोवतालची सामाजिक व्यवस्था, रूढी, परंपरा, भौगोलिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी कलाकृतीमध्ये येणारे समाजजीवन या सर्व घटकातील भाषिक वैशिष्टे त्या-त्या कलाकृतीत सामावलेली असतात. भाषा त्या घटकांना अनुसरून आली तरच कलाकृतीचे महत्त्व वाढते. प्रत्येक लेखकाच्या भाषाशैलीवर देश काळ परिस्थितीचा प्रभाव पडत असतो तसाच तो लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावरही पडलेला असतो. म्हणून लेखकाच्या शैलीवरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना करता येते.

कोणताही लेखक असो 'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती' या न्यायाने त्याच्या भाषेत, प्रतिमासृष्टीत व शैलीमध्ये विविधता जाणवते. 'प्रेषित' या कादंबरीतील भाषेला एक वेगळे स्थान आहे. प्रस्तुत कादंबरीतील भाषा ही शहरी असून खास त्या ढंगाने वापरली गेली आहे. ती कादंबरीत उठावदारपणे उत्स्फूर्तपणे आलेली आहे. त्यामुळे या कादंबरीत आलेले कोणतेही प्रसंग जीवंतपणे साकारलेले आहेत असे वाटते.

कोणत्याही वाङ्:मयीन कलाकृतीचे स्वरूप, तिचा आशय व अभिव्यक्ती त्यातील नावीन्यावर उभे असते. कलाकृतीचा आशय हा भाषाशैलीचे स्वरूप निश्चित करतो.

'प्रेषित' या कादंबरीत प्रारंभापासून ते अंतापर्यंत भाषेच्या स्वरूपात कोणताही बदल झालेला नाही. यामध्ये खूप घटना आलेल्या आहेत पण त्यांच्यामध्ये एकसूत्रता आहे. अनेक प्रसंग,घटना, आणि व्यक्ती यांचे उल्लेख आलेले आहेत. ठिकठिकाणी आपल्याला विज्ञान दिसून येते. वैज्ञानिक भाषा अनेक ठिकाणी आली आहे. "तुम्ही लोक पाहता ती तंत्रज्ञानातली प्रगती. ज्या विज्ञानावर ती आधारलेली आहे त्याच विज्ञानानं शरीरशास्त्रातही पुष्कळ प्रगती केली आहे. विसाव्या शतकात मेंदूतून येणाऱ्या विदयुलहरींचा अभ्यास सुरू झाला होता. कंप्यूटरसुध्दा अस्तित्वात आले होते. कंप्यूटरमध्ये माहिती कशी साठवली जाते याचा अभ्यास करून मानवी मेंदूत माहिती साठवण्याची क्षमता कशी येते याचा अभ्यास झाला आणि चालूही आहे. मेंदूत माहिती भरली जात असताना, तिचा वापर होत असताना त्यातून निघणाऱ्या विदयुलहरी आणि

शांत मेंदूतल्या विदयुलहरी वेगवेगळ्या प्रकारच्या असतात. त्या कशा आहेत, कशी कमीजास्त होतात, कशा बदलतात याची मोजमापं करून आम्ही मेंदूच्या कार्याबद्दल पुष्कळ काही सांगू शकतो. वेळ असला तर मी तुम्हांला प्रात्यक्षिकं दाखवीन."[१] (प्रेषित, पृ.२४.) "स्पेस-स्टेशन -१ वरून चंद्रकडे याने जात. स्पेस-स्टेशन-२ वरून अधिक लांबचे पल्ले गाठणारी सूर्यमालेतील ग्रहांकडे जाणारी याने निघत."[२] (प्रेषित, पृ.३९.) "चेंगने सँड्राला आपली रेकॉर्डिंगची यंत्रणा दाखवली. आलोकच्या डोक्यातील चकती त्याच्या मेंदूतील लहरी एकवटून त्याच्या बिछान्याखाली चेंगने लपवलेल्या ट्रान्समिटरकडे पाठवीत होती आणि ट्रान्समिटर त्यांची माहिती चेंगच्या खोलीत पाठवत होता."[3] (प्रेषित, पृ.७०.) "आपण कंप्यूटरमध्ये माहिती भरतो तशी मानवी मेंदूत पण भरता यायला हवी. ते तंत्रज्ञान आपल्याला अजून अवगत नाही, पण आलोकच्या लोकांना आहे-किंवा होतं."[४] (प्रेषित, पृ.८३.) अशी अनेक वर्णने वारंवार आलेली आपल्याला दिसतात.

शहरी जीवन, तेथिल वातावरण, परंपरा, उच्च संस्कृतीतील लोकांचे राहणीमान या कादंबरीतील भाषिक शैलीमुळे अचूकपणे चित्रित केल्या आहेत. त्याचबरोबर वैज्ञानिक क्षेत्रातील अनेक मान्यवर व्यक्ती, त्यांचे संशोधन यांचा उल्लेख या ठिकाणी आलेला दिसून येतो.

वैज्ञानिक संशोधकांमध्ये ही कादंबरी वावरत असल्यामुळे याठिकाणी इंग्रजी शब्दांचा वापर सर्रास केलेला आपल्याला दिसून येतो. रूट-६०, गुड ईव्हिनिंग, डीएन्ए, कंप्यूटर, स्टेट बॉर्डर, रिंग अ रिंग अ रोजेस, वर्ल्ड टॅलेंट स्कीम, थँक यू, यू आर वेलकम, सॅटेलाईट, इ. असे अनेक शब्द राजरोसपणे आलेले आपल्याला दिसून येतात. पण त्यामुळे कादंबरीला एक उठावदारपणा आलेला आहे.

वैज्ञानिकाने आपल्या वाङ्‌मयीन कलाकृतीमध्ये एखादया ज्वलंत विषयावर चर्चा करून आपले ठोस विचार मांडलेले असतात. त्यामुळे अशा साहित्याची भाषा ठाशीव, विचारगर्भ व समर्पक असते. नारळीकरांच्या प्रेषित या कादंबरीत आपल्याला हीच भाषाशैली दिसून येते. त्यामुळे कादंबरीला जीवंतपणा आलेला आहे.

## २. 'अभयारण्य' या विज्ञान कादंबरीचे भाषाविशेष

विज्ञानकादंबऱ्या साहित्यप्रकारांमध्ये अवकाश कथांची संख्या खूप मोठया प्रमाणावर आहे. अनेक नामवंत कादंबरीकारांनी अवकाश कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत.

कारण आपणास लहानपणापासूनच अवकाशाविषयी कुतुहल असते. आपणाला लहाणपणीच आकाश केवढं आहे? ते कुठे टेकले असेल? असे अनेक प्रश्न पडलेले असतात. आकाशाचा आकार केवढा? आपण या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा अनेकदा प्रयत्न करतो. याचाच अर्थ असा प्रत्येक मानवाला अवकाशाविषयीची जिज्ञासा असते. या जिज्ञासेपोटीच शास्त्रज्ञांनी देखिल संशोधनासाठी अवकाशात प्रवास करून आलेले वास्तव व काल्पनिक असे दोन्ही प्रकारचे अनुभव विज्ञानकादंबरीमधून मांडलेले आहेत. शास्त्रज्ञांना आलेला अनुभव तो जसाच्यातसा नाही तर वेगवेगळया पध्दतीने त्याला ललित साहित्याचे रूप देऊन विज्ञान कादंबरी या विज्ञान साहित्य प्रकाराची निवड करून सामान्य वाचकाला याची ओळख करून दिलेली आहे. 'अभयारण्य' या कलाकृतीचे वेगळेपण, त्यातील वाङ्:मयीन मूल्ये कादंबरी या वाङ्:मयप्रकारास आवश्यक असणाऱ्या वाङ्:मयीन कसोटया या अनुषंगाने अभयारण्यचे मूल्यमापन प्रस्तुत प्रकरणात केले आहे.

'अभयारण्य' या कादंबरीची एकूण बांधणी शहरी आणि ग्रामीण भाषिक शैलीवर उभी आहे. प्रत्येक कलाकृतीत भाषेला जसे महत्त्वाचे स्थान असते. तसेच कादंबरीमध्ये सुध्दा भाषेला अनन्यसाधारण महत्त्व असते. लेखकाने स्वत:च्या लेखनासाठी वापरलेली भाषा त्याच समाजजीवनातील असेल तर त्या कलाकृतीला एक प्रकारचा जीवंतपणा येतो. अन्यथा कलाकृतीचा तोल ढासळतो.

कोणताही लेखक असो त्याच्या लेखनकौशल्यामध्ये आपल्याला विविधता आढळून येते. 'अभयारण्य' या कादंबरीतील भाषेला एक वेगळे स्थान आहे. प्रस्तुत कादंबरीतील भाषा ही शहरी व ग्रामीण असून खास त्या ढंगाने वापरली गेली आहे. ती कादंबरीत उठावदारपणे उत्स्फूर्तपणे आलेली आहे. त्यामुळे या कादंबरीत आलेले कोणतेही प्रसंग जीवंतपणे साकारलेले आहेत असे वाटते.

"अंधारात तुम्ही कुठं कडमडणार आता? ही पहा तुमची आग! मी घेऊन आलो, आजोबा...."[१](अभयारण्य, पृ.१.) असे अनेक प्रसंग आलेले आहेत.

'अभयारण्य' या कादंबरीची भाषा ही नागर आणि ग्रामीण अशी संमिश्र स्वरूपाची आहे. स्थल-कालानुसार या कादंबरीची भाषा बदलत गेली आहे. लेखकाने आपले सर्व अनुभव आणि निरिक्षणे यांचे वर्णन करताना प्रत्येक वेळी योग्य ती भाषा वापरलेली आहे. त्यामुळे प्रत्येक प्रकरण मनावर वेगळाच ठसा उमटवून जाते.

ठिकठिकाणी शब्दांचा वापर करत असताना काही वेळेला मराठी शब्दांबरोबर इंग्रजी शब्द येताना आपल्याला दिसतात. ह्यूमन जीनाफम प्रोजेक्ट, ब्लू-प्रिंट, नट, बोल्ट, ट्रान्झिस्टर, आय.सी, मटेरियल, कन्व्हल्शन्स, रॅश, हाइड पार्क, स्पीकर्स, कॉर्नर, टॉप हॅट, कीप अप द गुड वर्क, शेकहॅण्ड, ईवन इफ यू आर बिफोर युवर टाइम, कम्युनिटी, इ. सारख्या अनेक शब्दांचा वापर याठिकाणी केलेला आपल्याला दिसून येतो. हे शब्द जरी दुसऱ्या भाषेतील असले तरी कादंबरीचे वाचन करताना त्यांचे वेगळेपण याठिकाणी जाणवत नाही. कादंबरीच्या आशयाला अनुसरून हे शब्द अतिशय समर्पकपणे कादंबरीत येतात व आशयात मिसळून जातात. त्याचबरोबर काही ठिकाणी हिंदी शब्दांचाही वापर केलेला आपल्याला दिसून येतो. मान लिया यासारखे शब्द वापरले आहेत. नारळीकरांचे लेखन फारसे नसूनही त्यांची आशयाची मांडणी करण्याची पध्दती वाखाणण्यासारखी आहे.

अभयारण्य कादंबरीची भाषा अतिशय साधी, सरळ आणि सोपी आहे. त्यामध्ये कोठेही क्लिष्ठता आलेली आपल्याला दिसून येत नाही. अनेक ठिकाणी वाक्यांची रचना चित्रदर्शी केलेली दिसून येते. "जेम्स! अरे गधडया! कसला उपद्व्याप आरंभला आहेस? साधं पाणी उकळण्याचं काम सोडून हे काय चाळे करतो आहेस? शर्थ झाली बाई!"[६] (अभयारण्य, पृ.१९.) "आणि एक दिवस तसा प्रसंग आलाच! जमशेद आणि त्याची टोळी एका रानडुकराचा पाठलाग करत होती. ते बिचारं झाडाझाडांतून वाकडंविकडं फिरत स्वतःला वाचावायचा केविलवाणा प्रयतन करत होतं. इतक्यात समोरून रुस्तमची टोळी आली आणि त्यातल्या एकावर जमशेद जाऊन आपटला. झालं...... लढाईला एवढा कारण पुरे झालं. ते डुक्कर गेलं पळूनरु पण ह्या दहा सिंहांमध्ये जुंपली......"[७] (अभयारण्य, पृ.६४.) अशा प्रकारच्या वाक्यरचनेतून प्रस्तुत प्रसंगाचे चित्रण वाचकांसमोर येते. त्यामुळे अभयारण्यची भाषा चित्रदर्शी भाषा आहे, असे म्हणावे लागेल. यातून नारळीकर यांच्या लेखनशैलीचे एक वेगळेपण दिसून येते.

नारळीकरांनी अभयारण्य या कादंबरीत ग्रामीण बोलीभाषेचा वापर तर केलेला आहेच. पण त्याबरोबर ठिकठिकाणी वाक्प्रचार, उपमा, प्रतिके, श्लोक यांचा वापरही केलेला दिसतो. "दिवि सूर्यसहस्त्रस्य भवेद्युगपदुत्थिता । यदि भाः सदृशी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सास्याद्भासस्तस्य महात्मनः ।।"[८] (अभयारण्य, पृ.२४.) "अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराजः ।

पूर्वापरौ तोयनिधीऽवगाह्य स्थितः पृथिव्या इव मानदण्डः ।।"[९] (अभयारण्य, पृ.७३.) अशाप्रकारची वर्णन आपल्याला पाहायला मिळतात. नारळीकरांची अभयारण्य ही कादंबरी विज्ञान कादंबरी असली तरी आपल्या शास्त्रीय माहितीबरोबरच त्यांनी आपल्या संस्कृतीची चांगली उदाहरणे लोकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

शं. द. जावडेकर आपल्या एका भाषणात म्हणतात, "विज्ञानाचा परिणाम मानवीजीवनावर आणि जीवननिष्ठेवर झाला आहे. मानवसंस्कृति आणि त्याची जीवननिष्ठा यांच्यावर विज्ञानाचा कोणता परिणाम घडत आहे त्याचा विचार केल्यावांचून आपणांस आजच्या जगांत जगतांहि यंणार नाही."[१०] ते याठिकाणी नारळीकरांनाही पटलेले दिसत आहे. त्यांनी आपल्या कादंबरीच्या माध्यमातून मानवी जीवनावर होणारे हे परिणाम अत्यंत सोप्या आणि सर्वसामान्यांच्या साध्या भाषेत मांडलेले आहेत. नारळीकरांनी अभयारण्य या कादंबरीतून बऱ्याच वर्षांच्या कालखंडाचे वर्णन केलेले आहे. त्याचबरोबर आजपर्यंत मानवाने केलेल्या तांत्रिक सर्व प्रगतींचा आढावा त्यांनी या ठिकाणी घेतलेला आपल्याला दिसून येतो. त्यांनी आदिमानवापासून ते अणुबॉम्बच्या शोधापर्यंतच्या गोष्टींचा आढावा या ठिकाणी घेऊन त्याच्या फायदयातोटयांचे अवलोकन केले आहे. त्यामुळे त्यांची भाषा स्थळकाळानुसार बदलत जाते. त्यामुळे स्थळकाळानुसार व व्यक्तिपरत्वे, त्यांच्या भाषाशैलीत परिवर्तन झाल्याचे दिसते. त्यांची भाषा प्रवाही व बदलत गेल्याने त्यांच्या लेखनशैलीत परिवर्तन झाल्याने अभयारण्यची भाषा संमिश्र स्वरूपाची वाटते.

## ४.३. 'प्रेषित' आणि 'अभयारण्य' कादंबऱ्यांमधील निवेदनाचे वेगळेपण

### १. 'प्रेषित' कादंबरीतील निवेदनाचे वेगळेपण

कादंबरीत निवेदनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. या निवेदनात अधिकाधिक ओघवतेपणा आणून आपली कलाकृती अधिक प्रवाही व यशस्वी करण्याचा प्रयत्न लेखक करीत असतो. कादंबरीत प्रसंग, घटना, विषय किंवा आशय इत्यादींमध्ये असणाऱ्या उणिवा निवेदनाच्या साहाय्याने लेखक भरून काढतो. वाचकाला जर कादंबरीत गुंतवून ठेवायचे असेल तर कादंबरीतील घटनांबरोबर निवेदनाला महत्त्वाचे

स्थान दिले गेले पाहिजे. 'प्रेषित' या कादंबरीमध्ये याच प्रकारच्या निवेदन शैलीचा प्रत्यय येतो.

'प्रेषित' या कादंबरीत चित्रदर्शी भाषेत निवेदन आलेले दिसून येते. कादंबरीचे स्वरूप कथात्मक परंतु लालित्यपूर्ण झाले आहे. या कादंबरीमध्ये अनेक घटना प्रसंग आले आहेत. व्यक्ती व व्यक्तींवर येणारे प्रसंग यांचा अनेक ठिकाणी उल्लेख आलेले आहेत. आलोक नाईक दांपत्याला सापडतो. त्यानंतर ते त्याला दत्तक घेतात. त्याचे शिक्षण सुरू होते. सर्व घटना झटपट घडताना दिसून येतात. त्याला कोणताही त्रास न सहन करता वर्ल्ड टॅलेंट स्कीममध्ये बुध्दिच्या जोरावर प्रवेश मिळतो. त्यातून पुढे तो सॉयक्लॉप्सपर्यंत पोहचतो आणि आपण ज्या कामासाठी पृथ्वीवर आलेलो आहोत हे काम तो पूर्ण करतो. कादंबरीमध्ये आलोकच्या जीवनाचे तटस्थपणे चित्रण आलेले आपल्याला दिसून येते. आलोकच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण ज्या क्षेत्रात झालेली आहे त्या क्षेत्रातील बोली असून तिचा उपयोग करून सुटसुटीत अशी वाक्यरचना वापरली असल्याने निवेदनाला एक प्रकारचा जीवंतपणा आलेला आहे.

## २. 'अभयारण्य' कादंबरीतील निवेदनाचे वेगळेपण

कादंबरीत निवेदनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. 'अभयारण्य' या कादंबरीमध्ये एका वैशिष्टयपूर्ण निवेदन शैलीचा प्रत्यय येतो.

दुर्गा भागवत म्हणतात, "नवी क्षितिजं निर्माण करण्याची आत्यंतिक गरज आज विज्ञान आपल्याला पटवून देतं आहे. कुठल्याही लेखकाला आपापल्या विषयाचं शास्त्रीय आकलन काही प्रमाणात तरी असल्याशिवाय त्याचं आज निभणार नाही."[११] यातून आपल्याला साहित्यामध्ये निर्माण झालेल्या नविन जाणिवांची जाणीव होते. या सर्वांचा विचार करून नारळीकरांनी आपल्या कादंबरीचा शास्त्रीय दृष्टीने विचार करून लेखन केले आहे. त्यांनी अभयारण्य ही कादंबरी अत्यंत तटस्थपणे व वास्तव घटनांना समोर ठेऊन मांडलेली आपल्याला दिसून येते. कादंबरी काल्पनिक असली तरी त्यामध्ये वास्तवाची किनार असल्याचे दिसून येते. परग्रहवासी आपल्या पृथ्वीचे निरिक्षण करत आहेत. तिच्या संरक्षणसाठी रात्रंदिवस तिच्यावर नजर ठेवून आहेत असे याठिकाणी दाखविले आहे. ही काल्पनिकता आहे. परंतु , वास्तवात मानवाने केलेल्या प्रगतीच्या खुणा वारंवार दाखविल्या आहेत. मानव ज्या गोष्टी अभिमानाने सांगतो. ज्या गोष्टींची

प्रौढी बाळगतो त्या गोष्टीच्या आहारी गेल्यामुळे एक दिवस पृथ्वीचा विनाश अटळ आहे हे नारळीकरांनी यातून दाखवून दयायचे आहे. पृथ्वीला वाचविण्यासाठी आणि मानवाला सावध करण्यासाठी त्यांनी परग्रहावरील लोकांचा आधार घेत कादंबरी रंगविली आहे. कादंबरीत अनेक घटना-प्रसंगाचे वर्णन येते. त्यांचे निवेदन हे प्रत्यक्ष निवेदनातून असलेले दिसते. यांनी केलेल्या निवेदनात कोठेही खंडता दिसत नाही. ते सलग एकापाठोपाठ एक घटना प्रसंग आणतात. कोणताही भाग आगंतुक किंवा ओढून-ताणून अथवा उपरा वाटत नाही. हे नारळीकरांच्या लेखनशैलीचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

अभयारण्यतील निवेदनशैली ही अगदी साधी, सुटसुटीत अशी आहे. या निवेदनावरून त्यातील व्यक्तिरेखांचे स्वभावदर्शन होते. निवेदन स्थलकालपरत्वे त्याचबरोबर प्रसंगानुसार बदलताना दिसते. त्यामुळे सर्व घटना, प्रसंगांना जीवंतपणा येतो.

### ४.४. 'प्रेषित' आणि 'अभयारण्य' कादंबऱ्यांतील वातावरणनिर्मिती

### १. 'प्रेषित' कादंबरीतील वातावरणनिर्मिती

नारळीकरांनी विज्ञानातील वास्तवाचा संबंध मानवी भावभावनाशी जोडून कादंबरीला वाङ्:मयीन गुणवत्ता प्राप्त करून दिली आहे. त्यामुळे वाङ्:मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने 'प्रेषित' कादंबरी लक्षणीय ठरते. "कोणताही ललित लेखक, कवी, कादंबरीकार, कथाकार आशय स्पष्ट करण्यासाठी व त्या आशयानुरूप वातावरण निर्मिती करत असतो. त्या कलाकृतीतील तो आशय अधिक गडद व्हावा वाचकाला त्यामध्ये गुंतवून ठेवण्यासाठी साहित्यिकाला वातावरण निर्मिती करावीच लागते. कलाकृतीतील आशयाशी वातावरणाचे एक नाते असते."[१२] प्रेषित या कादंबरीत आलोकचे जीवनचित्र रेखाटले आहे. सुरूवातीपासून मानव म्हणून कादंबरीत त्याला दाखविले आहे. त्याचे वाढते वय, त्याची बुध्दी, इतर मुलांपेक्षा असणारे असामान्यत्व आपल्याला अनेक घटनांच्या माध्यमातून दाखवून दिलेले आहे.

एका मानवी मूलाप्रमाणे त्याची वाढ झालेली आहे. पण त्याच्या अलौकिक बुध्दिमत्तेचा ठसा पावलोपावली उमटलेला आपल्याला दिसून येतो. त्याचबरोबर विज्ञानाने केलेली प्रगती आपल्याला पावलोपावली दिसून येते. प्रग्रहावरील संस्कृतीच्या

अस्वित्वाच्या खुणा आपल्याला दिसून येतात. त्या सर्व घटना मनात कायम घर करून राहतात.

कोणतीही कलाकृती यशस्वी होण्यासाठी, त्यामध्ये उत्कटता येण्यासाठी वातावरणनिर्मिती हा घटक महत्त्वाचा असतो. वातावरण निर्मिती ही कलाकृतीची गरज म्हणूनच येत असते. कलाकृतीतील प्रसंगांना, घटनांना अनुसरून वातावरण आले पाहिजे अशी त्या कलाकृतीचीच मागणी असते.

नारळीकरांनी ही कादंबरी लिहित असताना अत्यंत चांगल्या प्रकारे वातावरण निर्मिती अतिशय चांगल्या प्रकारे केलेली आहे. कोठेही प्रांजळपणे उगीचच वर्णने आलेली आपल्याला दिसून येत नाहीत. शास्त्रीय कारणे समोर ठेवून आवश्यक तोच आशय मांडलेला आहे. मर्यादशीर आशय मांडतानासुध्दा त्याला तुटकपणा न आणता अतिशय चांगल्या वातावरणात एकसंगपणे 'प्रेषित' या कादंबरीची मांडणी केलेली आहे असे दिसून येते.

**२. 'अभयारण्य' या विज्ञान कादंबरीतील वातावरणनिर्मिती**

कादंबरीत वातावरणालाही महत्त्वाचे स्थान आहे. वातावरण हे केवळ दुय्यम दर्जाचे अथवा प्रतिकात्म अर्थ सुचविणारे नसते तर ते संबंध कादंबरीलाच व्यापून उरलेले असते. व्यक्ती आणि घटना यांच्या निवेदनातून कादंबरी बनलेली असते. व्यक्ती आणि घटनांचे भौगोलिक, सामाजिक आणि कालिक अवकाशाखेरीज असणे केवळ अशक्य आहे. म्हणूनच वातावरण हा कादंबरीचा अपरिहार्य घटक ठरतो. 'अभयारण्य' या कादंबरीतील भाषाशैली, निवेदनकौशल्य त्याचबरोबर वातावरणनिर्मिती हा घटकसुध्दा तितकाच महत्त्वाचा आहे. लेखकाने प्रस्तुत कादंबरीत घटना प्रसंगांची मांडणी करताना वातावरणनिर्मिती प्रसंगाला अनुरूप अशी केल्याने कादंबरीचा आशय, भाषा त्याचबरोबर सर्व प्रसंग समजण्यास मदत होते.

अभयारण्यची भाषा ग्रामीण तसेच नागर बोलीभाषा असल्याने लेखकाने मांडलेले प्रसंग किंवा त्यावेळचे वातावरण हे त्या त्या परिसरातील, वातावरणास सुसंगतपणे निर्माण केल्याने कांदबरीची परिणामकारकता वाढली आहे. लेखकाने वापरलेली भाषाशैली काहीशी चित्रदर्शी असल्याने मांडलेल्या प्रसंगाचे चित्रण व वातावरण वाचकाच्या डोळयापुढे चित्रित होते. ही एक लेखकाची हातोटी म्हणता येईल. प्रत्येक कलाकृतीला

प्रसंगानुसार वातावरण असते. परंतु, वातावरणनिर्मिती, घटना-प्रसंगांना सुसंगत असेल तर कलाकृतीला जीवंतपणा प्राप्त होतो.

नारळीकरांनी ज्या उद्‌देश्याने ही कादंबरी लिहिली आहे. तो आपल्याला अनेक प्रसंगातून दिसून येतो. तो उद्‌देश्य स्पष्ट करताना लेखक परग्रहवासीयांच्या मार्फत सांगतो, "पण आम्हांला असेही दिसले की विज्ञान-तंत्रज्ञानाचा आधार घेऊन प्रगतीची दिशा ठरवताना तुमचा दृष्टिकोन अधिकाधिक संकुचित होत चालला आहे. त्यामुळे एखादया संशोधनाचा फायदा पाहताना त्याचे तोटे, त्यासाठी मोजावी लागणारी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष किंमत तुम्ही पाहत नाही. म्हणून औद्योगिक क्रांतिनंतर पर्यावरणाचा ऱ्हास तुम्ही होऊ दिलात. तुमच्या सूर्याच्या इतर आठ ग्रहांना न लाभलेले उत्कृष्ट पर्यावरण पृथ्वीवरूनही नाहीसे करण्याचा तुम्ही प्रयत्न केलात.

"पण आम्ही हेही पाहिले की आम्ही थोडी सूचना केली की तुमच्यापैकी काही निवडक सुज्ञ लोक ती उचलून धरतात आणि तुम्हांला वाकडया मार्गावरून परावृत्त करतात. म्हणूनच आता पर्यावरणाचा ऱ्हास थांबलेला दिसतो. याचा अर्थ असाही असू शकेल की प्रगतीच्या एका ठरावीक स्तरावर पोचल्यानंतर माणसात थोडा परिपक्वपणा येतो आणि नव्या संशोधनाकडे तो सर्वांगीणपणे पाहू शकतो. तुमचे पुढचे अवलोकन करून आम्हांला कळेल, तुम्ही कितपत परिपक्व झाला आहांत.

"आम्ही केवळ दुरून पाहत नसून तुमचे संरक्षकही आहेत. असाही एक प्रसंग येऊन गेला की दुसऱ्या एका जीवसृष्टीची दृष्टी एकडे फिरली होती आणि हा ग्रह स्वत:च्या वसाहतीकरता वापरण्याचा तिचा इरादा होता. मुंगीला तुम्ही चिरडता तसे त्या जीवांनी तुम्हांला चिरडले असते. अशा वेळी आम्ही मध्ये पडून त्यांना परतवले, कारण हे अभयारण्य आम्हांला अबाधित ठेवायचे होते - आणि यापुढेही ठेवायचे आहे."[१३] (अभयारण्य, पृ.९५.) अशा प्रसंगातून आपल्याला लेखकाचा उद्‌देश दिसून येतो. एका बाजूने विविध प्रश्नांचा ठाव घेत दुसऱ्या बाजूला वाचकांना अंतर्मुख करून जाते. अभयारण्य या कादंबरीतील इतर घटकांसोबत वातावरणनिर्मिती ही सर्व घटना, प्रसंग, संवादांना सुसंगत असल्याने कादंबरीला एक वेगळया प्रकारची रंजकता आल्याचे जाणवते. नारळीकरांनी या कादंबरीची वातावरणनिर्मिती प्रसंगानुरूप केल्यामुळे या कादंबरीची उंची वाढलेली आहे.

## ४.७. 'प्रेषित' आणि 'अभयारण्य' या विज्ञान कादंबऱ्यांतील प्रसंगवर्णन

### १. 'प्रेषित' या विज्ञान कादंबरीतील प्रसंग वर्णन

नारळीकरांनी 'प्रेषित' या कादंबरीत अनेक प्रसंगांचे चित्रण मोठ्या कौशल्याने तसेच परिणामकारकरीत्या केले आहे. त्यात अतिशयोक्ती नाही किंवा प्रसंगांची स्वत: ओढून ताणून केलेली रचना नाही. कलाकृतीच्या आशयाला आवश्यक साजेसे असे वातावरण आहे. त्याचबरोबर प्रत्येक प्रसंग विशिष्ट क्रमाने घडत आहे. त्यात कुठेही कृत्रिमता दिसून येत नाही. ओघाओघाने तो येतो. तसे पाहता नारळीकर यांचे हे महत्त्वाचे कौशल्य म्हणता येईल. लेखनाचा प्रदीर्घ अनुभव नसूनही त्यांचे हे कौशल्य अधोरेखित होते.

प्रत्येक गोष्टीला शास्त्रीय कारण असते. आपण त्या कारणाचा शोध घेतल्यास त्यामागील सत्यता आपल्या समोर येते. हे नारळीकरांनी आपल्याला पटवून दिले आहे. उदा. आलोक हा आळशी आहे. त्याच्या वयाच्या मुलाप्रमाणे तो वागत नाही. असे ज्यावेळी मालिनी सांगते. तेव्हा सुधाकर आलोकच्या वागण्याचा खुलासा त्याची बाजू घेवून करतो. तो म्हणतो, "जरा त्याच्या बाजूनं विचार कर की! संत्र्याची साल काढून आतला भाग खातात हे त्यानं पाहिलयं आणि त्याला माहित झालंय. तसंच आपली बोटं साल काढू शकणार नाहीत याची त्याला जाणीव आहे. तेव्हा उगीच संत्र्याशी झगडण्यात काय फायदा? म्हणून तो गप्प बसला. उलट तो महेंद्रच बिनडोक. त्याला अजून कळलं नाही की संत्र्याची साल काढल्यावर आतला भाग खायचा असतो."[१४] (प्रेषित, पृ.२७.) अशा

अनेक प्रसंगांचे वर्णन लेखकाने केले आहे. अशा अनेक प्रसंगांतून नारळीकर यांनी कलाकृतीला जीवंतपणा आणण्याचा प्रयत्न केला आहे. एखादया प्रसंगाचे वर्णन वाचताना त्याचक्षणी त्या प्रसंगाचे चित्र डोळयासमोर उभे राहणे हे एक या कादंबरीचे वैशिष्ठ्य म्हणता येईल.

### २. 'अभयारण्य' या विज्ञान कादंबरीतील प्रसंगवर्णन

नारळीकरांनी 'अभयारण्य' या कादंबरीत अनेक प्रसंगांचे चित्रण अतिशय मोजक्या आणि स्पष्ट शब्दात केले आहे. कलाकृतीच्या आशयाला आवश्यक असणारे योग्य असे

वातावरण आहे. त्याचबरोबर प्रत्येक प्रसंग योग्य त्या क्रमाने घडत आहे. त्यात कुठेही कृत्रिमता दिसून येत नाही. नारळीकर यांचे हे महत्त्वाचे कौशल्य म्हणता येईल. जास्त लेखन केलेले नसूनही त्यांचे हे कौशल्य प्रशंसाजनक आहे.

कादंबरीत लेखकाने अनेक प्रसंगांचे चित्रण केलेले आहे. प्रत्येक प्रसंग आपल्या डोळयांसमोर उभा करण्याचा प्रयत्न डॉ. नारळीकरांनी केलेला दिसून येतो. डॉ. नारळीकरांच्या लेखनाचे आपल्याला हे एक महत्त्वाचे वैशिष्ठ्य दिसून येते. "युध्द झालंच तर आणि ह्या शहराला धोका असेल तर सहा महिने बंकरमध्ये राहायची तयारी ठेवा. जर सुरक्षामापक यंत्रांनी वर येणं सुरक्षित आहे अशी ग्वाही दिली तर आम्ही तुम्हांला कळवू आणि मगच तुम्ही वर येऊ शकता. तत्पूर्वी बाहेर पडायची दुर्बुध्दी तुम्हांला झालीच तर तुमच्या सुरक्षेची जबाबदारी आम्ही घेऊ शकणार नाही."[१५] (अभयारण्य, पृ. ६७.) "शेवटी, आम्ही कोण? कुठले? ह्या प्रश्नांची उत्तरे तुम्हांला पुरेशी परिपक्वता आल्यावर आपोआप मिळतील. अर्थात आम्ही पृथ्वीवरून तुमच्यावर लक्ष ठेवून आहोत, त्यामुळे आजच्यासारखी गरज पडली तर हस्तक्षेप करू शकतो. पण आम्हांला शोधायला जाऊ नहा ..... आम्ही सापडणार नाही. एवढी मात्र खात्री बाळगा की आम्ही कुठेही असलो तरी तुमचे कल्याण हेच आमचे ध्येय आहे."[१६] (अभयारण्य, पृ. ९६.) अशा प्रकारे नारळीकर हे तपशिलांनी प्रसंगाचे वर्णन करतात. त्यामुळे प्रत्यक्ष तो प्रसंग डोळयासमोर एखादया चित्रपटासारखा उभा राहतो. असे अनेक प्रसंग मनाला चटका लावून जातात.

## ४.६. 'प्रेषित' आणि 'अभयारण्य' या विज्ञान कादंबऱ्यांतील सवांदकौशल्ये

### १. 'प्रेषित' या विज्ञान कादंबरीतील सवांदकौशल्ये

कादंबरीत घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा या घटकांना जेवढे महत्त्व असते. तेवढेच संवाद या घटकाला महत्त्वाचे स्थान आहे. संवाद हे माध्यम कथा, आत्मकथा, कादंबरी इत्यादीपेक्षा नाटकामध्ये अत्यंत महत्त्वाचा ठरते. नाटकामध्ये प्रत्येक प्रसंग खुलवण्यासाठी व प्रभावीपणे मांडण्यासाठी संवादाला महत्त्वाचे स्थान असते. त्याचप्रमाणे कादंबरीतील सर्व घटना प्रसंगांचे चित्रण करण्यासाठी त्याचप्रमाणे घडलेल्या घटना

सांगण्यासाठी संवादकौशल्य महत्त्वाचे असते. त्याने कादंबरीस जीवंतपणा येण्यास मदत होते.

'प्रेषित' या कादंबरीचा विचार करता असे लक्षात येते की नारळीकर यांच्याकडे संवादाच्या माध्यमातून आशय अभिव्यक्त करण्याचे कौशल्य आहे. जी व्यक्ती संवाद बोलते ती ज्या समाजातील आहे. त्यानुसार कादंबरीत भाषा आलेली दिसते. प्रस्तुत कादंबरीचा नायक, त्याचे मित्र, त्याचा परिवार व इतर पात्रांमध्ये झालेले संवाद हे शहरी व उच्च शिक्षित समाजातील आहेत. त्यामुळे हा समाज लगेच डोळयासमोर उभा राहतो.

कादंबरीतील घटना, प्रसंगवर्णने अचूक शब्दांमध्ये व्यक्त करण्यास लेखक यशस्वी झालेले आहेत. उदा. "जादू हाय तुमच्या हातात बाई!"[१७] (प्रेषित, पृ.१९.) "जसं काय मी गळकं भांडंच आहे!"[१८] (प्रेषित, पृ.६९.) यासारख्या प्रसंगातून अचूक चित्र डोळयासमोर उभे करण्यामध्ये लेखक यशस्वी झालेले आहेत. लेखकाजवळील संवादकौशल्य हे मनाला भिडणारे आहे. ते मनात घर करून राहते. माणसाला त्यावर विचार करायला लावणारे असे आहे.

कादंबरीत म्हणीचा व वाक्प्रचारांचा अगदी एकदोनदाच वापर केलेला आपल्याला दिसून येतो. पण तो योग्य ठिकाणी आल्यामुळे संवाद परिणामकारक व मनाला भिडणारे बनले आहेत. या कादंबरीतच्या श्रेष्ठत्वामध्ये लेखकाच्या संवाद कौशल्याचा मोठा वाटा आहे. यातील संवाद वाचकांचे लक्ष वेधून घेणारे आहेत.

### २. 'अभयारण्य' या विज्ञान कादंबरीतील सवांदकौशल्ये

कादंबरीत घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा या घटकांना महत्त्व असते. त्याप्रमाणेच संवाद या घटकाला महत्त्वाचे स्थान आहे. संवाद हे माध्यम कथा, आत्मकथा, कादंबरीमध्ये अत्यंत महत्त्वाचा ठरते. कादंबरीतील सर्व घटना प्रसंगांचे चित्रण करण्यासाठी त्याचप्रमाणे घडलेल्या घटना सांगण्यासाठी संवादकौशल्य महत्त्वाचे असते. त्याने कादंबरीस सजिवत्व येण्यास मदत होते.

अभयारण्य कादंबरीत आलेले संवाद हे कधी हळूवार, कधी गंभीरपणे आलेले दिसतात. तर कधी खटकेबाज दिसतात. काही ठिकाणी म्हणीचा वापर केलेला

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आपल्याला दिसून येतो. "येईल तो! तसा शहाणा झालाय तो आताशा."[१९] (अभयारण्य, पृ.९.) "तो पर्याय खरा ठरला तर पृथ्वीवरील माणसाची धडगत नाही असं मी म्हणेन!"[२०] (अभयारण्य, पृ.१७. ) "हे बटण पहा, शर्माजी! हे तुमच्यासमोर दाबून मी दिल्लीवर अणुहल्ल्याचा आदेश दिला आहे. तुम्हांला आता फक्त तीन मिनिटंच उरली आहेत जगायला!"[२१] (अभयारण्य, पृ.९१.) अशा प्रकारचे संवाद आपल्याला पाहायला मिळतात. अभयारण्य या कादंबरीतील संवाद हे आशयाला धरून आलेले दिसतात. त्यामध्ये वैज्ञानिक भाषेचाही वापर केलेला आपल्याला दिसून येतो. शास्त्रज्ञांच्या तोंडी असणारी भाषा काही ठिकाणी आपल्याला पाहावयास मिळते. तर काही ठिकाणी लोकांच्या कल्याणासाठी झटणारी आणि त्यांचे कल्याण चिंतणारी भाषा आपल्याला दिसून येते.

नारळीकरांनी कादंबरीत काही ठिकाणी म्हणींचा व वाक्प्रचारांचा वापर केलेला आपल्याला दिसून येतो. त्यामुळे संवाद परिणामकारक व मनाला भिडणारे बनले आहेत. या कादंबरीतच्या श्रेष्ठत्वामध्ये लेखकाच्या संवाद कौशल्याचा मोठा वाटा आहे. यातील संवाद वाचकांचे लक्ष वेधून घेणारे आहेत.

## ४.७. 'प्रेषित' आणि 'अभयारण्य' या विज्ञान कादंबऱ्यांच्या मुखपृष्ठ व शीर्षकाची यथार्थता

### १. 'प्रेषित' या विज्ञान कादंबरीच्या मुखपृष्ठ व शीर्षकाची यथार्थता

'प्रेषित' या कादंबरीचे मुखपृष्ठ हे अत्यंत सूचक आहे. मुखपृष्ठावरती सभोवताली काळया व पिवळया रंगामध्ये रेषा आहेत. काळया रेषा गोलाकार दाखविल्या आहेत. मुखपृष्ठाच्या वरच्या भागात पिवळा गोल दिसत आहे. जणूकाही अंतराळातून तेजस्वी प्रकाश खाली येत आहे. खाली एक व्यक्ती दिसत आहे. मुखपृष्ठावरील चित्राचा विचार करता ते आशयाशी सुसंगत आहे. नारळीकरांनी या कादंबरीत हेच दाखविले आहे. अंतराळातून एक परग्रहवासी पृथ्वीवर येवून पृथ्वीचे निरिक्षण करतो. पृथ्वीवरील माणसाच्या सवयींचे अवलोकन करतो. पृथ्वीवरील माणसांची, पृथ्वीची माहिती तो आपल्या ग्रहावर पाठविण्याची तयारी करतो. जणू काही त्याने पृथ्वीला कवेत घेतलेले आहे. हेच नारळीकरांना या ठिकाणी सुचवायचे आहे. मुखपृष्ठावरून ते स्पष्ट दिसत आहे. 'प्रेषित'

या शब्दाचा सूचक अर्थ याठिकाणी सार्थ झाल्याचे दिसून येते. दुसऱ्या ठिकाणावरून आलेला आणि आपल्या चांगल्याचा विचार करणारा असा हा प्रेषित याठिकाणी दिसून येतो.

**२. 'अभयारण्य' या विज्ञान कादंबरीच्या मुखपृष्ठ व शीर्षकाची यर्थार्थता**

जयंत नारळीकर यांच्या अभयारण्य या कादंबरीचे शीर्षक हे ही लक्षवेधी असून आकर्षक व समर्पक आहे. लेखकाने अभयारण्य ही संकल्पना याठिकाणी सार्थ केलेली दिसते. पृथ्वीला एका घनदाट अभयारण्याची उपमा दिलेली आहे. पृथ्वीवरील सजीव हे पृथ्वी नावाच्या अभयारण्याची शोभा आहेत. असे लेखकाने दाखविले आहे.

मुखपृष्ठ हे अतिशय बोलके असलेले आपल्याला दिसून येते. अथांग अंतराळ दिसत आहे. या अंतराळात अनेक तारे चमकत आहेत. पृथ्वी खोलवर दिसत आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागावर पृथ्वीचे असणारे वैभव, सजीवसृष्टी दिसत आहे. झाडे दिसत आहेत. एक हिरवेगार झाड असून त्यावर एक पक्षी बसलेला आहे. जणू काही तो अभिमानाने आपल्या पृथ्वीचे निरिक्षण करत आहे. अभयारण्य हे समृध्द आहे आणि ते असेच समृध्द ठेवावे असे काही नारळीकरांना यातून प्रतीकात्मरूपाने सुचवायचे आहे असे वाटते.

'अभयारण्य' हे शीर्षक अगदी योग्य वाटते. अभयारण्य म्हणजे जिथे अभय आहे. कसलीही भिती नाही असे आरण्य. म्हणजेच पृथ्वी तिला अभयारण्याची स्थिती प्राप्त व्हावी ही लेखकाची इच्छा आहे. नारळीकरांनी दिलेले हे शीर्षक अतिशय बोलके वाटते.

## ४.८. निष्कर्ष

१. 'प्रेषित' या कादंबरीत आलेली भाषा ही शहरी आणि वैज्ञानिकांच्या तोंडी शोभणारी भाषा आहे.

२. 'प्रेषित' या कादंबरीत अनेक वैज्ञानिक शोधांचा उल्लेख केलेला आहे.

३. 'प्रेषित' या कादंबरीत अनेक उपमांचा वापर केलेला आहे.

४. 'प्रेषित' या कादंबरीत आलोकच्या बुध्दिमत्तेचे अनेक पैलू आपल्याला दिसून येतात.

५. 'प्रेषित' या कादंबरीच्या माध्यमातून परग्रहावरील सृष्टीची कल्पना आपल्या डोळयासमोर उभी राहते.

६. 'प्रेषित' या कादंबरीत आलेल्या उल्लेखावरून आपल्याला असे लक्षात येते की पृथ्वीपेक्षा अनेक प्रगत ग्रह अस्तित्वात असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

७. 'प्रेषित' या कादंबरीतून असे दिसून येते की मानवाला अजून प्रगती करणे आवश्यक आहे.

८. 'अभयारण्य' या कादंबरीची भाषा ही ग्रामीण आणि नागर अशा दोन्ही स्वरूपाची असलेली दिसून येते.

९. 'अभयारण्य' या कादंबरीतून मानवाने केलेल्या विविध तांत्रिक प्रगतीचा अंदाज येतो.

१०. 'अभयारण्य' या कादंबरीतून लेखकाने मानव निर्सगापासून दूर चालला आहे हे दाखवून दिले आहे.

११. 'अभयारण्य' या कादंबरीतून नारळीकरांच्या वाङ्:मयीन व्यक्तिमत्त्वाचे वेगळे दर्शन दिसून येते.

१२. 'अभयारण्य' या कादंबरीतून नारळीकरांमध्ये, असणारी सामाजिक बांधिलकी मानणारा व मानवतावदी दर्शन घडविणारा शास्त्रज्ञ म्हणून प्रत्यय येतो.

## ४.९ समारोप

'प्रेषित' व 'अभयारण्य' या कादंबरीचा एकूणच आवाका लक्षात घेण्यासाठी कादंबरींची वाङ्:मयीन गुणवत्ता शोधावी लागते. प्रस्तुत प्रकरणामध्ये 'प्रेषित' व 'अभयारण्य' या कादंबरींचे वाङ्:मयीन मूल्यमापन केले आहे. कादंबरीतील प्रसंग, संवाद, भाषाशैली, निवेदन शैली, वातावरण, इ. वाङ्:मयीन घटकांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आला आहे.

मराठी साहित्यामध्ये कादंबरी या वाङ्:मयप्रकाराने एक स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. त्यात विज्ञान कादंबरींची संख्या कमी आहे. त्यामुळे विज्ञान साहित्याकडे दुर्लक्ष झालेले दिसून येते. म्हणून या ठिकाणी प्रेषित या कादंबरीचा स्वतंत्रपणे विचार केलेला आहे. विज्ञान आणि परग्रहसंस्कृती यांची जाणीव मानवाला करून देण्याचे काम

या कादंबरीने केलेले आहे. परग्रहावर संस्कृती अस्तित्वात आहे याला दुजोरा देणाऱ्या या दोन्ही कादंबऱ्या आहेत. नारळीकरांनी या कादंबऱ्यात वेगळा विषय हाताळलेला आपल्याला दिसून येतो.

मराठी विज्ञान कादंबरीची वाटचाल संथ असतानाच डॉ. जयंत नारळीकर यांच्यासारखा जगप्रसिध्द शास्त्रज्ञ विज्ञानसाहित्यकार म्हणून वाचकांच्या समोर आले आणि या ठिकाणी मराठी विज्ञान कादंबरी नारळीकर टप्प्यावर येऊन पोहचली.

विज्ञान कादंबरीचा हा टप्पा अत्यंत महत्त्वाचा ठरला. विशिष्ट चाकोरीत रेंगाळणाऱ्या मराठी विज्ञान कादंबरीला चाकोरीबाहेर काढण्याचे काम नारळीकरांच्या विज्ञान कादंबरीने केले आहे.

## ४.१० संदर्भसूची


१. नारळीकर, जयंत : प्रेषित, मौज प्रकाशन, पाचवी आवृत्ती, पृ.२४.

२. तत्रैव : पृ.३९.

३. तत्रैव : पृ.७०.

४. तत्रैव : पृ. ८३.

५. नारळीकर, जयंत : अभयारण्य, मौज प्रकाशन, तिसरी आवृत्ती, पृ. क्र. ९.

६. तत्रैव : पृ. १९.

७. तत्रैव : पृ. ६४.

८. तत्रैव : पृ. २४.

९. तत्रैव : पृ. ७३.

१०. जावडेकर, शं. द. : मराठी साहित्य संमेलन - अध्यक्षीय भाषणे, हीरक महोत्सव प्रकाशन, पृ. क्र. १२५.

११. भागवत, दुर्गा : शतकाची विचार-शैली, कराड: १९७५, पृ. क्र. ७१८.

१२. पाठक, यशवंत : विज्ञान साहित्याची दिशा (युगवाणी) मे-जून, १९८५, पृ.२३.

१३. नारळीकर, जयंत : अभयारण्य, मौज प्रकाशन, तिसरी आवृत्ती, पृ. क्र. ९५.

१४. नारळीकर, जयंत : प्रेषित, मौज प्रकाशन, पाचवी आवृत्ती, पृ.२५.

१५. नारळीकर, जयंत : अभयारण्य, मौज प्रकाशन, तिसरी आवृत्ती, पृ. क्र. ६७.

१६. तत्र : पृ.९६.

१७. नारळीकर, जयंत : प्रेषित, मौज प्रकाशन, पाचवी आवृत्ती, पृ. १९.

१८. तत्रैव : पृ.६९.

१९. नारळीकर, जयंत : अभयारण्य, मौज प्रकाशन, तिसरी आवृत्ती, पृ. क्र. ९.

२०. तत्रैव : पृ.१७.

२१. तत्रैव : पृ.३१.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.